महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे 411 001
Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं . ०२०/२६१११९५३

क्र. एनजीसी/नेट/सेट/पीएच.डी/मवि३/ 8508 दिनांक - २५/४/२०१४

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य

S.N.D.T.W. UNIVERSITY
MUMBAI-20.
05 MAY 2014
No. (6)
Estb Section

**विषय - मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर**
**रिट याचिका क्रमांक - २४४८/२०१३, ३२१८/२०१३, ३४३५४/२०१३, ६४५९/२०१३**
**सुनिल मिश्रा, आकार बहु. ग्रामिण विकास संस्था व इतर अमर सेवा मंडळ व इतर**
**विरुद्ध**
**महाराष्ट्र शासन**

**संदर्भ -** शासन पत्र क्रमांक न्यायप्र - २०१३(३६३/१३)/विशि-१ दिनांक १७ जानेवारी २०१४

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित शासन पत्र कृपया पहावे.

उपरोक्त संदर्भांकित शासन पत्रान्वये कळविल्यानुसार उपरोक्त विषयांकित याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २१ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या आदेशातील अधोरेखीत मुद्यांचे अवलोकन करुन सदर मुद्यामध्ये Net/Set धारक उमेदवारांची उपलब्धता व ज्या महाविद्यालयामध्ये अर्हताधारक मान्यता प्राप्त नियमित स्वरुपाच्या शिक्षकांची भरती करण्यात आलेली नाही अशा महाविद्यालयाच्या संदर्भातील माहिती मा. उच्च न्यायालयास सादर करावयाची आहे. त्यामुळे या मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती संपूर्ण माहिती संचालक, उच्च शिक्षण कार्यालयास १५ दिवसांत सादर करण्याविषयी कळविण्यात आले होते.

वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापक पदासाठी नेट/सेट किंवा पीएच.डी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यासाठी सेट परीक्षा पुणे विद्यापीठामार्फत घेतली जाते व नेट परीक्षा केंद्र सरकारतर्फे घेतली जाते. सेट/नेट परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध होऊ शकते. परंतु सदर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले परंतु महाविद्यात सेवेत न लागलेले उमेदवार किती आहेत याची माहिती अधिकृतपणे उपलब्ध होत नाही. तसेच पीएच.डी धारण केलेले उमेदवार उमेदवार परंतु महाविद्यालयाच्या सेवेत न लागलेले उमेदवार किती आहेत याची माहिती अधिकृतपणे उपलब्ध होत नाही.

प्रत्येक विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार व माहिती व मार्गदर्शन केंद्र आहे. सदर केंद्रामार्फत जास्तीत जास्त खप असलेल्या दैनिक वृत्तपत्रात नेट/सेट असलेले परंतु बेरोजगार किंवा महाविद्यालयात सेवेत नसलेल्या उमेदवारांनी नोंदणी करण्याबाबत जाहिरात द्यावी. जाहिरातीमध्ये उमेदवारांना नाव नोंदणीसाठी ३ आठवडयांची मुदत द्यावी. सदर माहिती खालील तक्त्यात देण्यात यावी.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव, पत्ता, मो.नंबर | नेट/सेट/पीएच.डी या पैकी कोणती पात्रता धारण केली आहे? | नेट/सेट/पीएच.डी झालेले वर्ष | नेट/सेट/पीएच.डी चे विषय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

Circular Estt

Academic (Academic)

R.[illegible]
Pl. discuss

सदर माहिती संकलित करुन संचालनायास सादर करावी. जेणेकरुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर माहिती उपलब्ध होऊ शकेल सदर माहिती कोट केसच्या अनुषंगाने शासनास सादर करता येईल.

२५/५/२०१५

(डॉ. प्र. रा. गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत- सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

२/- याना कळविण्यात येते की, वर नमूद केलेली माहिती विद्यापीठाशी सतत संपर्कात राहून उपलब्ध करुन संचालनालयास सादर करावी.